**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अन्वये रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीस कांदळगाव, जि.रायगड येथे नवीन पारेषण वाहिन्या उभारण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०३/ऊर्जा-४,**

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ११ मार्च, २०२६

संदर्भ :

१) पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेड यांचे पत्र क्र.१/२५-२६/ITP-११२/Rfp, दि.२७.११.२०२५.
२) मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम यांचे क्र.एम.एस.ई.टी.सी.एल./ सी.ओ./सी.ई./ एस.टी.यु./टी.बी.सी.बी./४१२, दि.१९.०१.२०२६ रोजीचे पत्र.
३) शासन निर्णय क्र.पावामो-२०२१/प्र.क्र.१७०(भाग-१)/ऊर्जा-४, दि.०२.११.२०२२ व दि.०१.१२.२०२२.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात सध्या वीजेची मागणी २९,००० मेगावॅट इतकी वाढली असुन सन २०२६-२७ मध्ये सदर मागणी ३४,००० ते ३५,००० मेगा वॅट व सन २०३० मध्ये सदर मागणी ४२,००० ते ४५,००० मेगावॅट पर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता वाढत्या वीजेच्या मागणीची पूर्तता करण्याकरिता पारेषण वाहिन्यांची क्षमता वाढविणे व पारेषण वाहिन्यांचे बळकटीकरण करणे अनिवार्य आहे. त्यानुषंगाने ७६५/४००/२२० के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्र व संबंधित जोड प्रणाली पारेषण वाहिन्या उभारणी, वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेव्दारे (TBCB-Tariff Based Competitive Bidding) करणे नियोजित आहे. सबब, रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीकडून कांदळगाव, जि.रायगड येथे उभारण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ७६५/४००/२२० के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्र व त्याकरीता उभारण्यात येत असलेल्या संबंधित जोड प्रणाली पारेषण वाहिनीस विद्युत अधिनियम, २००३ च्या अंतर्गत कलम ६८ अन्वये पूर्व परवानगी प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रायगड जिल्ह्यात कांदळगाव येथे ७६५/४००/२२० के.व्ही. (ए.आय.एस.) वीज उपकेंद्र उभारणी व संबंधित जोड प्रणाली (वाहिन्या) उभारण्यासाठी 'वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा' प्रक्रियेव्दारे (TBCB-Tariff Based Competitive Bidding) पारेषण सेवा पुरवठादार (TSP-Transmission Service Provider) बोलीधारकाची निवड करण्यासाठी पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेड कंपनी यांना बोली प्रक्रिया समन्वयक (BPC-Bid Process Coordinator) म्हणुन नियुक्त केले आहे. BPC ने रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड ही विशेष हेतूसाठी स्थापित केलेली संस्था (SPV) आहे.

वीजदरावर आधारित स्पर्धात्मक बोली निविदा प्रक्रिया राबवून रायगड जिल्ह्यात कांदळगाव येथे ७६५/४००/२२० के.व्ही. (ए.आय.एस.) उपकेंद्र उभारणी व त्याकरीता उभारण्यात येत असलेल्या संबंधित जोड प्रणाली (वाहिन्या) उभारण्याकरिता रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीस भारतीय विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अंतर्गत खालील अटी आणि शर्तींच्या अधीन राहुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर वीज प्रकल्प उभारणी रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड स्वखर्चाने, विहित केलेल्या प्रमाणित पध्दतीने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करेल. या वीज वाहिनीचा वापर कंपनीने ज्या प्रयोजनार्थ करावयाचा ठरविला आहे; केवळ त्याच प्रयोजनासाठी करणे कंपनीस बंधनकारक राहील.

२. सदर प्रकल्पाच्या कामाचे स्वरुप व प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| **Sr. No.** | **Scope of the Transmission Scheme** |
|---|---|
| 1. | Establishment of AIS Kandalgaon with 3x1500 MVA, 765/400 kV ICTs with 240 MVAr Bus Reactor at 765 kV Level and 2x500 MVA, 400/220 kV ICTs with 125 MVAr Bus Reactor at 400 kV Level.<br>• 765/400 kV, 1500 MVA, ICT-3 Nos. (10x500 MVA single phase units including one spare ICT Unit)<br>• 240 MV Ar, 765 kV Bus Reactor - 1 No. (4 x 80 MVA single phase units including one spare Reactor Unit)<br>• 400/220 kV, 500 MVA, ICT - 2 Nos.<br>• 125 MVAR,420 kV Bus reactor-1 No<br>• 765 kV ICT bays-3 Nos.<br>• 400 kV ICT bays -5 Nos.<br>• 765 kV line bays -4 Nos.<br>• 400 kV line bays - 4 Nos.<br>• 765 kV Bus reactor Bay- 1 No.<br>• 400 kV Bus reactor bay-1 No.<br>• 220 kV ICT bays - 2 Nos.<br>• 220 kV line bays - 2 Nos.<br>• 220 kV Transfer Bus Coupler- 1 set<br>• 220 kV Bus Coupler-1 No<br><br>**Future space Provisions:-**<br>• 765/400 kV, 1500 MVA, ICT-1 No<br>• 400/220 kV, 500 MVA, ICT -1 No<br>• 765 kV line bays- 4 Nos.<br>• 400 kV line bays - 4 Nos<br>• 220 kV line bays - 2 Nos. |
| 2. | LILO on 765 kV D/C line from Satara (Proposed) to Pune-III (Proposed) at 765 kV AIS Kandalgaon |
| 3. | LILO on 400 kV D/C line from Dabhol to Nagothane at 765 kV AIS Kandalgaon |
| 4. | 220 kV D/C line from 765 kV AIS Kandalgaon to 220 kV Kandalgaon (Existing)<br>• 220 kV line bays at 220 kV Kandalgaon (Existing) - 02 Nos |

३. या वीज वाहिन्या कार्यान्वित / प्रभारीत करण्यापूर्वी याबाबतच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून यथास्थिती मुख्य विद्युत निरिक्षक / मुख्य अभियंता (विद्युत) यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

४. वीज वाहिन्यांचे संचलन व व्यवस्थापन, रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड ही कंपनी स्वत: करेल.

५. वीज वाहिनी उभारल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या / संबंधित जागा मालकांच्या जर काही तक्रारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांसमवेत विचारविनिमय करून त्या तक्रारींचे योग्यरित्या निराकरण करण्याची जबाबदारी रायगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीची असेल.

६. सदर वीज वाहिनी उभारणे व कार्यान्वित ठेवणे यानुषंगाने आवश्यक असलेले सर्व परवाने मिळविणे, विहित केलेल्या निकषांची पूर्तता करणे. तसेच, शासनाची विविध प्राधिकरणे / विभाग / वीज नियामक आयोग इत्यादींचे इतर प्रचलित नियम त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी विहीत केलेले नियम व अटी आणि शर्ती कंपनीवर बंधनकारक राहतील.

७. सदर परवान्याचा कालावधी परवानापत्र दिल्यापासून ३५ वर्षांचा असेल, उक्त कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर वाहिनीबाबत शासन उचित आढावा घेऊन निर्णय घेईल.

८. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ मधील अटी आणि शर्ती व त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल, या विभागाचे शासन निर्णय क्र.पावामो-२०२१/प्र.क्र.१७० (भाग-१)/ऊर्जा-४, दि.०२.११.२०२२ व दि.०१.१२.२०२२ मधील नमूद अटी आणि शर्ती तसेच राज्य शासन व केंद्र शासनाची अशा पारेषण वाहिन्या संबंधिची वेळोवेळी जाहीर झालेली/ होणारी धोरणे मार्गदर्शक सूचना या पारेषण वाहिन्यांस लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०३१११११४४३४७६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

UDDHAV RABHAJI DAHIPHALE

Digitally signed by UDDHAV RABHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Energy Department, 2.5.4.20=05B3CA49B9A0A924FD4D8743E6E254E742308F02108527986E098AFC27201F30, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D80774C9ED65ECA9BE69006934BFB5C4CA32AB0DC1A2EC57463984588DF1C37, cn=UDDHAV RABHAJI DAHIPHALE
Date: 2026.03.11 11:45:24 +05'30'

**( उ.र.दहिफळे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (अपारंपारीक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.

१२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

१३) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

१४) पीएफसी कंसल्टिंग लिमिटेड, पहिला मजला, ऊर्जानिधी,१ बाराखंबा रोड, कनॉट प्लेस, नवी दिल्ली.

१५) निवडनस्ती (ऊर्जा-४).

**********